# मनोरीतील निक्षारीकरण प्रकल्पाला गती

## सल्लागाराची नियुक्ती; २०० दशलक्ष लि. प्रतिदिन क्षमता

मुंबई, ता. १ : मनोरी येथे उभारण्यात येणाऱ्या २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या निक्षारीकरण प्रकल्पाला गती देण्यात आली आहे. यासंबंधित सविस्तर प्रकल्प अहवाल, नवीन निविदा दस्तऐवज आणि अंदाजपत्रक तयार करण्यासाठी महापालिकेकडून टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कामासाठी सल्लागारासाठी एकूण ६.०८ कोटी एवढा खर्च मंजूर करण्यात आला आहे.

पूर्वी नियुक्त मूळ प्रकल्प प्रवर्तक मे. आयडीई वॉटर टेक्नॉलॉजीज यांनी तयार केलेल्या अहवालानुसार तीनदा निविदा मागवण्यात आल्या होत्या, मात्र अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याने त्या रद्द करण्यात आल्या.



**पाणीपुरवठ्यासाठी महत्त्व**

प्रकल्पाच्या तपशीलवार अंदाजित खर्चास आणि टाटा कन्सल्टन्सी इंजिनिअरबरोबर कंत्राट करण्यास महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या तरतुदीनुसार प्रशासकाची मंजुरी मागण्यात आली आहे. हा प्रकल्प मुंबईच्या भविष्यातील पाणीपुरवठा वाढवण्यासाठी महत्त्वाचा मानला जात असून, आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया पुढे सरकणार आहे.

**मुख्य मुद्दे:**

**३ हजार २०४** कोटी
प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च

**६.०८** कोटी
अंदाजित सल्लागार शुल्क

**१०** महिने
करार कालावधी

**निधी व्यवस्था**
पाणीपुरवठा प्रकल्प खात्यातील **२०२५-२६** च्या भांडवली तरतुदीतून.